*Open Access, Peer Reviewed, Research Journal*
©JES Printer and Publisher
Print & Online available on https://jesbulletin.in
**Research Article**

# क्रीडा पर्यटन करिअर म्हणून संधी

**प्रा. डॉ . सचिन सुभाषराव चामले**
**शारीरिक शिक्षण संचालक**
**कै. रसिका महाविद्यालय, देवणी तालुका – देवणी जिल्हा – लातूर ( महाराष्ट्र )**

**Article Info**

**Received**: 21/02/2025
**Revised**: 11/03/2025
**Accepted**:15/03/2025

**Keywords**: क्रीडा पर्यटन, उद्योग खेळ ,मानवी बुद्धी.

सारांश

क्रीडा पर्यटन हे एक अतिशय उभरते क्षेत्र आहे, जे क्रीडा आणि पर्यटन उद्योगाच्या संयोगातून तयार झाले आहे. क्रीडा पर्यटनामध्ये क्रीडा स्पर्धांचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक दूरदर्शन कार्यक्रमांवरून किंवा स्थानिक आयोजनांमध्ये सहभाग घेतात. क्रीडा पर्यटनासाठी विविध प्रकारच्या क्रीडाप्रकारांचा समावेश होतो, जसे की क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, टेनिस, ओलिंपिक इ. यामध्ये पर्यटकांना थेट स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची, त्यांच्या आवडीच्या क्रीडाप्रकारांचे अनुभव घेण्याची आणि स्थानिक संस्कृतीसाठी क्रीडासंस्थांच्या माध्यमातून परिषदा किंवा शो पाहण्याची संधी मिळते. क्रीडा पर्यटन क्षेत्राच्या विकासाने स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना दिली आहे. विविध क्रीडाच्यायोजनांमुळे रोजगार निर्माण होतो, पर्यटन क्षेत्राची वृद्धी होते आणि स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन मिळते. क्रीडा पर्यटन क्षेत्राने असंख्य नोकऱ्या आणि करिअर संधी निर्माण केल्या आहेत, जसे की इव्हेंट मॅनेजमेंट, पर्यटन मार्गदर्शन, स्पोर्ट्स मार्केटिंग आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये. क्रीडा पर्यटनाचा विकास या क्षेत्रातील करिअर संधींची निर्मिती करतो, जे खासकरून पर्यटन, इव्हेंट मॅनेजमेंट, मीडिया आणि विपणन क्षेत्रांमध्ये दिसून येतात. हे क्षेत्र एक नवीन दिशा आणि विस्तार प्रदान करते, ज्यामुळे क्रीडा आणि पर्यटन उद्योग दोन्हीला आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरतो.

## प्रस्तावना:

आजच्या युगात खेळ आणि पर्यटन केवळ छंद किंवा मनोरंजनाच्या मर्यादेत राहिलेले नाहीत, तर ते मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक संधी निर्माण करणारी क्षेत्रे बनली आहेत. खेळ क्षेत्रातील जागतिकीकरण, प्रायोजकत्व आणि क्रीडा उद्योगाच्या वाढत्या व्याप्तीमुळे व्यावसायिक खेळाडूंसह प्रशिक्षक, क्रीडा व्यवस्थापक, पत्रकार, आणि आरोग्य तज्ज्ञ यांसाठी मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. तसेच, पर्यटन हा एक अत्यंत वेगाने वाढणारा उद्योग असून, तो केवळ प्रवासापुरता मर्यादित राहिलेला नाही. साहसी पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, इको-टुरिझम, आणि क्रीडापर्यटन यांसारख्या विविध पर्यायांमुळे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत आहे. जागतिकीकरणामुळे आणि डिजिटल क्रांतीमुळे पर्यटन उद्योगात तांत्रिक आणि व्यवस्थापन कौशल्ये असणाऱ्या व्यावसायिकांची मागणी वाढली आहे. या संशोधन पेपरमध्ये खेळ आणि पर्यटन या दोन्ही क्षेत्रांमधील करिअर संधी, आवश्यक शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि त्यामधील आर्थिकदृष्ट्या फायदेशीर संधी यांचा सखोल अभ्यास करण्यात आला

आहे. युवकांनी या क्षेत्रातील विविध पर्यायांचा विचार करून आपल्या आवडी आणि कौशल्यांनुसार योग्य करिअर निवडावे, यासाठी हा संशोधन पेपर उपयुक्त ठरेल. खेळ आणि पर्यटन हे दोन क्षेत्रे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून, त्यामध्ये उज्ज्वल करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. आधुनिक युगात खेळ आणि पर्यटन उद्योग वेगाने विकसित होत आहेत. या संशोधन पेपरमध्ये या क्षेत्रांमधील संधी, आवश्यक कौशल्ये आणि भविष्यातील संभाव्यता यांचा अभ्यास केला आहे.

**क्रीडा पर्यटनाची संकल्पना आणि महत्त्व:**

क्रीडा पर्यटन म्हणजे खेळाशी संबंधित प्रवास, जिथे लोक विशेषतः स्पर्धा पाहण्यासाठी, खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी किंवा स्वतः खेळण्याच्या उद्देशाने प्रवास करतात.

**1. आर्थिक वाढ** –

स्पर्धा खेळण्यासाठी किंवा पाहण्यासाठी बाहेर देशातून किंवा बाहेर राज्यातून किंवा इतर जिल्ह्यातून खेळाडू प्रेक्षक हे आपल्याच येतात त्यामुळे आपल्या शहरांमधील वेगवेगळ्या सुविधांचा ते वापर करतात त्यातून आर्थिक उलाढाली होतात त्यातून आपली व इतर सुविधा देणाऱ्यांची आर्थिक वाढ होते. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेस चालना मिळते.

**2. संस्कृती आणि पर्यटनाचा विकास** –

आपल्या शहरांमध्ये खेळाडू व प्रेक्षक आल्यामुळे आपल्या संस्कृतीची देवानघेवान होते व त्यातून आपल्या संस्कृतीचा प्रसार होतो. त्यामुळे आपल्या व त्यांच्या विविध संस्कृतींची देवाणघेवाण होते.

**3. आरोग्य आणि तंदुरुस्ती** –

इतर देशातील खेळाडू व प्रेक्षक आपल्या देशामध्ये येतात ते कोणत्या स्पर्धेसाठी आले आहेत त्यावरून त्या खेळातील क्रीडा संस्कृती हे प्रदर्शित करतात त्यामुळे क्रीडा पर्यटकांमध्ये फिटनेस व खेळाविषयी जागरूकता निर्माण होते त्यातून सुदृढ नागरिकांची निर्मिती होते व देश बळकट होतो. स्थळांची प्रसिद्धी – आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटन स्थळांची ओळख निर्माण होते.

**2. स्थळांची प्रसिद्धी** –

आपण ज्या देशामध्ये स्पर्धा आयोजित करतो किंवा कोणत्या ठिकाणावर ते आपण स्पर्धा आयोजित करतो हे महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे त्या ठिकाणाची प्रसिद्धी होतो त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरती व राष्ट्रीय स्तरावरती त्या शहराची त्या जागेची प्रसिद्धी होते. आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटन स्थळांची ओळख निर्माण होते.

**क्रीडा पर्यटनाचे प्रकार**

**1) सक्रिय क्रीडा पर्यटन (Active Sports Tourism)** -जिथे पर्यटक स्वतः खेळ खेळतात, जसे की ट्रेकिंग, सायकलिंग, स्कीइंग, आणि स्कूबा डायव्हिंग.

**2) प्रेक्षक म्हणून क्रीडा पर्यटन (Passive Sports Tourism)** - जिथे पर्यटक स्पर्धा पाहण्यासाठी प्रवास करतात, जसे की क्रिकेट वर्ल्ड कप, ऑलिम्पिक, फुटबॉल लीग इत्यादी.

**3) नॉस्टॅल्जिक क्रीडा पर्यटन (Nostalgic Sports Tourism)** - प्रसिद्ध क्रीडांगण, संग्रहालये किंवा खेळाडूंच्या जन्मस्थळांना भेट देणे.

**4) अभ्यास आणि प्रशिक्षण पर्यटन (Training & Educational Tourism):** खेळाडू किंवा प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा, किंवा अभ्यास दौरे.

**1. खेळ पर्यटन क्षेत्रातील कौशल्ये**

खेळ पर्यटन (Sports Tourism) हा एक वेगाने वाढणारा क्षेत्र आहे, ज्यामध्ये खेळ पाहण्यासाठी किंवा खेळण्याच्या उद्देशाने प्रवास केला जातो. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी खालील कौशल्ये महत्त्वाची ठरतात .खेळ आणि पर्यटन क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी काही महत्त्वाची कौशल्ये आवश्यक आहेत. खेळ आणि पर्यटन ही दोन वेगवेगळी पण एकमेकांशी निगडीत क्षेत्रे आहेत. या दोन्ही क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी विशिष्ट कौशल्ये आवश्यक असतात. खाली या कौशल्यांचे सविस्तर विवरण दिले आहे.

**(अ) संवाद कौशल्ये (Communication Skills)**

विविध भागधारकांशी (खेळाडू, पर्यटक, स्थानिक गाईड, हॉटेल व्यवस्थापक) संवाद साधण्याची कुशलता असणे गरजेचे आहे. परदेशी पर्यटकांसाठी इंग्रजी किंवा इतर भाषा बोलण्याचे कौशल्य लाभदायक ठरू शकते.

- **बहुभाषिकता (Multilingualism)** –

विविध भाषांमध्ये संवाद साधण्याची क्षमता असल्यास अधिक संधी मिळतात. विविध देशातील खेळाडू पर्यटक हे आपल्या येथे स्पर्धेसाठी येत असतात त्या देशाची जी भाषा आहे त्या भाषेचे ज्ञान असणे खूप महत्त्वाचे आहे ती भाषा आपणास बोलता आली पाहिजे व त्या खेळाडू पर्यटकांचे शंकेचे निराकरण झाले पाहिजे

- **ग्राहक सेवा (Customer Service Skills)**

खेळ पर्यटनात ग्राहक सेवा ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते पर्यटकांना मदत करणे आणि त्यांचे समाधान राखणे महत्त्वाचे कारण ती पर्यटकांचा अनुभव सुधारते आणि त्यांना समाधानकारक सेवा प्रदान करते. उत्कृष्ट ग्राहक सेवा दिल्यास खेळ पर्यटक पुन्हा येतात तसेच इतर लोकांनाही शिफारस करतात. सन्मान आणि आदर – ग्राहकांशी आदराने आणि मैत्रीपूर्ण वर्तन करणे. संवाद कौशल्य – स्पष्ट, नम्र आणि तत्पर संवाद ठेवणे. समस्या निवारण – कोणत्याही अडचणी त्वरित सोडवणे आणि पर्यटकांना मदत करणे. वेळेचे व्यवस्थापन – खेळांच्या वेळापत्रकानुसार सेवा पुरवणे आणि वेळेचे योग्य नियोजन करणे. स्थानीय माहिती – खेळाच्या आयोजनस्थळी जाण्यासाठीच्या सुविधा, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स यांची माहिती देणे.

**खेळ पर्यटनातील ग्राहक सेवेतील महत्त्वाची क्षेत्रे**

- ✓ **स्टेडियम आणि क्रीडा स्थळांवरील सेवा** तिकिटे, आसन व्यवस्थापन, अन्न आणि पेय सेवा.
- ✓ **प्रवास आणि वाहतूक सेवा** – विमानतळावर स्वागत, स्थानिक वाहतूक सुविधा, गाइड सेवा.
- ✓ **निवास आणि आदरातिथ्य सेवा** – हॉटेल बुकिंग, विशेष सोयी-सुविधा, पर्यटन मार्गदर्शन.
- ✓ **ऑनलाइन आणि दूरध्वनी सेवा** –ग्राहकांच्या तक्रारी आणि विचारांसाठी हेल्पलाइन, त्वरित मदत.
- ✓ **इव्हेंट व्यवस्थापन** – खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांबाबत योग्य माहिती आणि मदत पुरवणे.

**(ब) संघटन कौशल्ये (Organizational Skills)**

खेळाशी संबंधित प्रवास, तिकिटे, निवासव्यवस्था आणि कार्यक्रमांचे नियोजन करण्याची क्षमता आवश्यक असते. मोठ्या प्रमाणावर लोक व्यवस्थापन आणि वेळेचे नियोजन करणे महत्त्वाचे ठरते.

**1. योजना आणि व्यवस्थापन (Planning & Management)** –

क्रीडा पर्यटन (Sports Tourism) हा पर्यटनाचा एक महत्त्वाचा प्रकार असून यात खेळांशी संबंधित प्रवास आणि पर्यटन समाविष्ट असते. क्रीडा स्पर्धा पाहण्यासाठी किंवा स्वतः खेळ खेळण्यासाठी प्रवास करणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. क्रीडा पर्यटन यशस्वी होण्यासाठी योग्य योजना आणि व्यवस्थापन आवश्यक असते.

**क्रीडा पर्यटनाची योजना (Planning)**

- **पर्यटनस्थळ निवड**

क्रीडा स्पर्धा आयोजित करत असताना किंवा क्रीडा पर्यटन करत असताना पर्यटन स्थळाची योग्य निवड करावी जेणेकरून खेळाडू व प्रेक्षक यांना त्या पर्यटन स्थळी येण्यास सुविधा निर्माण होतील याचा योग्य निर्णय घेऊन क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यासाठी योग्य जागेची निवड करावी

- **भौगोलिक आणि हवामानासंबंधी तपासणी**

हवामान व भौगोलिक स्थिती कशी आहे याची तपासणी करावी त्यानंतरच त्या ठिकाणी क्रीडा स्पर्धा आयोजित कराव्यात.

- **पोहोच आणि सुविधा यांचा अभ्यास-**

क्रीडा स्पर्धा आयोजित करत असताना आपण निवडलेल्या ठिकाणी किंवा पर्यटन स्थळा ठिकाणी पोहोचण्यासाठी कोणकोणत्या सुविधा आहेत विमान, रेल्वे, बस, टॅक्सी यांचा विचार करावा. जेणेकरून आपण आयोजित केलेल्या स्पर्धेच्या ठिकाणी क्रीडा प्रेक्षक हे उपस्थित राहतील त्यांना येण्यास अडचण होणार नाही. याचा विचार करणे गरजेचे आहे. त्यातून क्रीडा प्रेक्षकांची येण्याची संख्या वाढेल त्यावरून आपण केलेली योजना हे व्यवस्थित रित्या पार पाडली जाईल.

- **लक्ष्यित प्रेक्षक आणि खेळाडू-**

आपण क्रीडा स्पर्धा आयोजित करत असताना ती स्पर्धा कोणत्या वयोगटातील किंवा स्तरातील खेळाडू आणि प्रेक्षक यासाठी आयोजित होणार आहे. त्यावरून आपल्याला विविध योजना आखाव्या लागतील जसे एखादी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा आपण आयोजित करत आहोत त्या खेळातील मुख्य आकर्षक खेळाडू कोण आहेत कोणत्या दोन देशात ती स्पर्धा होणार आहे . राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटक आकर्षित होतील याकरिता रणनीती आखावी लागेल त्यावरून क्रीडा प्रेक्षकांची संख्या ही खूप वाढते व त्यावरून योजना आखणे गरजेचे आहे.

- **सुविधा आणि इन्फ्रास्ट्रक्चर** –

क्रीडा स्पर्धा आयोजित करत असताना आपण स्पर्धेसाठी लागणाऱ्या सुविधा व इन्फ्रास्ट्रक्चर याचा अभ्यास करणे गरजेचे आहे जेणेकरून स्पर्धा आयोजित करत असताना आपल्याला सुविधा वायफाय स्ट्रक्चर इन्फ्रास्ट्रक्चर हे व्यवस्थित रित्या भेटतील व स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण पडतील येणाऱ्या खेळाडूंना व क्रीडा प्रशिक्षक प्रेक्षकांना त्याचा उत्तमरीत्या फायदा होईल व त्यातून यशस्वी आयोजन होईल. यासाठी स्टेडियम, मैदाने, जलतरण तलाव, आणि इनडोअर गेम्ससाठी सुविधा, हॉटेल्स, वाहतूक, रुग्णालये, आणि इतर आवश्यक सेवा ,टेक्नॉलॉजी आणि डिजिटल तिकीट व्यवस्थापन या बाबींच्या व्यवस्थितरित्या योजना कराव्या लागतील.

- **मार्केटिंग आणि जाहिरात** –

स्पर्धेची स्थळ निश्चित झाल्यानंतर आपल्या देशामध्ये किंवा आपल्या शहरांमध्ये क्रीडा प्रेक्षकांच्या संख्येत वाढ होण्यासाठी सोशल मीडिया, वेबसाइट आणि जाहिरातींद्वारे आपल्या शहरात होणाऱ्या क्रीडा स्पर्धेचे प्रमोशन करावे लागेल त्याचबरोबर स्थानिक सरकार आणि खासगी भागीदारांसोबत संलग्नता करून विविध सुविधांसाठी करार करावे लागतील. त्यातून प्रेक्षकांना, पर्यटकांना त्यांना आवडेल अशा आकर्षक पॅकेजची निर्मिती करावी लागेल व त्याचा प्रचार व प्रसार करावा लागेल.

- **पर्यावरणपूरकता (Sustainability)** –

आपण आयोजित करत असलेल्या क्रीडा स्पर्धेमुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होणार नाही याचा विचार करणे व पर्यावरण पूरक सुविधांचा वापर करावा उदाहरणार्थ - प्लास्टिकचा वापर करू नये. पाणी व विजेचा वापराबाबत योग्य नियोजन करणे त्याचबरोबर त्या परिसरातील स्थानिक समुदायाला नागरिकांना आपल्या क्रीडा स्पर्धेमुळे कशा पद्धतीने रोजगाराच्या संधी मिळतील यावरती लक्ष केंद्रित करून योजना आखावी.

**क्रीडा पर्यटन व्यवस्थापन (Management of Sports Tourism)**

- **आयोजन आणि अंमलबजावणी** –

सर्व स्तरावरील स्पर्धा आयोजित करत असताना आपणास त्या स्पर्धेचे वेळापत्रक बनवणे खूप गरजेचे आहे. वेळापत्रक बनवत असताना स्पर्धेचा कालावधी स्थळ खेळाडू संख्या प्रेक्षकांची संख्या याचा विचार करावा लागतो. याचे योग्य व्यवस्थापन केल्यानंतरच हे वेळापत्रक आपण सर्वांना वितरित करतो. त्यामुळे आयोजन करत असताना वेळापत्रक हा मुख्य घटक आहे. खेळाडूंची व प्रेक्षकांची सुरक्षा हा आयोजनाचा मुख्य घटक आहे. स्पर्धा आयोजित करत असताना स्पर्धा सुरक्षित रित्या कशी यशस्वी होईल व एखाद्या वेळेस वैद्यकीय सेवेची गरज पडली तर त्याची उपलब्धता कशा सोयीस्कर पद्धतीने होईल याचा विचार करून त्याबाबत व्यवस्थापन करणे गरजेचे आहे त्यासाठी वेगवेगळ्या वैद्यकीय सुविधा कशा आपल्याला उपलब्ध होतील हे गरजेचे आहेत. मोठ्या स्तरावरील स्पर्धा आपण आयोजित करतो त्यावेळेस किती क्रीडा प्रेक्षक स्पर्धा पाहण्यास उपस्थित राहू शकतात. त्याचा अंदाज घेता आसन व्यवस्था व त्यांची तिकीट

विक्री याची योग्य नियोजन लावणे खूप गरजेचे आहे. त्यावरून तिकीट ऑनलाईन व ऑफलाईन विक्रीचे व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

- **लॉजिस्टिक्स आणि वाहतूक व्यवस्थापन**

स्पर्धा आयोजन करत असताना ज्या स्थळावरती आपण स्पर्धा आयोजित करत आहोत त्या ठिकाणी प्रेक्षकांना येण्यासाठी प्रवास सुविधा आहेत का नाही व त्या कशा पद्धतीने आपल्याला त्या ठिकाणी ठेवता येतील याबाबत व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्यात आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू, प्रेक्षक यांना गैरसह होणार नाही याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे त्यावरूनच सार्वजनिक वाहतूक व खाजगी वाहतूक सुविधा निर्माण करून द्यावे लागतील. वाहतुकी सोबतच पार्किंग शटल सेवा स्थानिक वाहतूक सुविधा यांचे पण व्यवस्थित व्यवस्थापन असणे महत्त्वाचे आहे.

- **स्वयंसेवक आणि कर्मचारी व्यवस्थापन**

मोठ्या स्पर्धा आयोजन करायचे म्हणले तर त्या साठी मोठा कर्मचारी वर्ग लागतो त्यात प्रशिक्षित कर्मचारीवर्ग असणे हे महत्त्वाची बाब आहे. प्रत्येक कामासाठी वेगवेगळ्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी जेणेकरून काम व्यवस्थित रित्या पूर्ण होईल. त्यासाठी आपल्याला प्रशिक्षित कर्मचारी व स्वयंसेवकांची आवश्यकता असते. स्पर्धा आयोजन करत असताना वेगवेगळ्या संस्थांचे स्वयंस्वयक हे स्वतःहून स्पर्धा पूर्ण करण्यास सहकार्य करतात अशा निवडक स्वयंसेवकांची नियुक्ती करून स्पर्धा स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी स्वयंसेवकांच्या नियुक्तीचे व त्यांच्या कामाचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. खेळाडूंच्या व प्रेक्षकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांची व इतर संरक्षण रक्षकांची मदत घेऊन व्यवस्थापन करणे जेणेकरून स्पर्धा पूर्ण करण्यास व्यत्य येणार नाही व जीवित हानी होणार नाही यासाठी सुरक्षिततेबाबत व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

- **आर्थिक व्यवस्थापन** –

क्रीडा स्पर्धा आयोजन करत असताना सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे आर्थिक बाब आर्थिक बाबीचे व्यवस्थापन करत असताना सुरुवातीला आपणास स्पर्धेचे अंदाजपत्रक बनवणे गरजेचे आहे. त्यावरून होणारा खर्च किती आहे त्यानुसार अनुदान, तिकीट विक्री, जाहिरातीतून उत्पन्न , प्रायोजकत्व या गोष्टींचे व्यवस्थापन करावे लागेल. याव्यतिरिक्त खर्च वाढत असेल तर सरकारतर्फे अनुदान किंवा खाजगी संस्थांकडून निधी मिळतो का यावरती काम करणे यासाठी वेगळ्या व्यक्तींची नियुक्ती करून त्याबाबतचे व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आर्थिक बाब असेल तरच आपण सर्व गोष्टी व्यवस्थित त्या पूर्ण करू शकू.

**2) वेळ व्यवस्थापन (Time Management)** –

क्रीडा पर्यटनात वेळेचे योग्य व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे असते. खेळांच्या स्पर्धा, प्रवास, विश्रांती आणि इतर उपक्रम वेळेच्या नियोजनानुसार पार पडल्यास संपूर्ण अनुभव अधिक यशस्वी आणि आनंददायक होतो. वेळेचे योग्य नियोजन केल्यास क्रीडा पर्यटनाचा अनुभव अधिक आनंददायक होतो. स्पर्धा, प्रवास, विश्रांती, आणि पर्यटन यांचा समतोल राखून व्यवस्थापन केल्यास वेळेचा अपव्यय टाळता येतो आणि संपूर्ण प्रवास अधिक सुव्यवस्थित होतो. त्यासाठी वेळेचे व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

- **स्पर्धा आणि प्रवासाचे नियोजन -**

खेळाच्या वेळापत्रकानुसार प्रवासाच्या तारखा ठरवाव्यात त्यानुसार प्रवासासाठी वापरले जाणाऱ्या प्रणालीचे जसे विमान, रेल्वे किंवा अन्य वाहतुकीसाठी वेळेचे योग्य नियोजनानुसार प्रवासाच्या वेळा आणि खेळाच्या वेळा यात समतोल राखावा.

- **नोंदणी आणि तिकीट व्यवस्थापन**

स्पर्धेसाठी किंवा इव्हेंटसाठी तिकिटे वेळेवर बुक करावीत. प्रवेशासाठी किंवा बुकिंग साठी लागणाऱ्या कागदपत्रांची आणि ओळखपत्रांची तयारी करून घ्यावी व त्याची माहिती पर्यटकांना द्यावी.पर्यटकांना त्रास होणार नाही यासाठी गर्दी टाळण्यासाठी आगाऊ नोंदणी करणे सोयीचे ठरते.

- **स्थानिक वाहतूक आणि स्थलांतर नियोजन**

स्टेडियम, हॉटेल, आणि अन्य पर्यटनस्थळे यांच्यातील अंतर समजून घ्यावे. त्यानुसार वाहतुकीच्या वेळा आणि ट्रॅफिक याचा अंदाज घेऊन नियोजन करावे. इव्हेंटच्या

आधी आवश्यक तेथे लवकर पोहोचण्यासाठी पर्याय उपलब्ध ठेवावा.

- **खेळाडूंसाठी वेळेचे नियोजन -**

खेळाडूंच्या सराव सत्रांसाठी वेळ निश्चित करावा. खेळाडूंच्या खाण्या-पिण्याच्या वेळा आणि शरीराच्या ऊर्जा व्यवस्थापनासाठी वेळ निश्चित करावा. खेळाडूंना स्पर्धेपूर्वी पुरेशी विश्रांती घेण्यासाठी वेळ राखीव ठेवावा.

- **पर्यटन आणि विश्रांती व्यवस्थापन** –

क्रीडा स्पर्धेव्यतिरिक्त पर्यटनासाठी वेळ कसा राखता येईल हे ठरवावे. त्यानुसार आवडेल अशा पर्यटन स्थळावरती भेटीच्या वेळेचे नियोजन करावे. स्पर्धा संपल्यानंतर पर्यटनस्थळे पाहण्यासाठी पुरेसा वेळ राखीव ठेवावा. पर्यटकांना सोयीस्कर होईल पद्धतीने विश्रांती आणि आरामासाठी वेळ देणे गरजेचे आहे.

- **डिजिटल साधनांचा वापर करून वेळेचे नियोजन** –

क्रीडा स्पर्धा व पर्यटन स्थळी जाण्यासाठी वेळ व्यवस्थापनासाठी मोबाईल ॲप्स (Google Calendar, Event Planner) चा वापर करावा. दिनांक वेळ यानुसार अलार्म आणि रिमाइंडर लावून वेळेचे योग्य नियोजन करता येते स्पर्धांचे वेळापत्रक ऑनलाइन ट्रॅक करून वेळेच्या बदलांची माहिती मिळवून नियोजन करता येते.

**3) आपत्ती व्यवस्थापन (Crisis Management)** –

क्रीडा पर्यटनादरम्यान विविध प्रकारच्या आपत्ती निर्माण होऊ शकतात, जसे की नैसर्गिक आपत्ती, वैद्यकीय आणीबाणी, सुरक्षा धोके, वाहतूक समस्यांमुळे उशीर, इत्यादी. त्यामुळे प्रभावी आपत्ती व्यवस्थापन आवश्यक आहे. अनपेक्षित अडचणींवर मात करण्यासाठी तत्पर राहणे. क्रीडा पर्यटनादरम्यान प्रभावी आपत्ती व्यवस्थापनासाठी नियोजन, संप्रेषण, वैद्यकीय सुविधा, आणि सुरक्षा यंत्रणा सज्ज असणे गरजेचे आहे. यामुळे खेळाडू आणि पर्यटक यांचा अनुभव सुरक्षित आणि आनंददायक होतो.

- **संभाव्य धोके आणि आपत्ती ओळखणे (Risk Assessment)** –

क्रीडा स्पर्धा किंवा क्रीडा पर्यटनाचे आयोजित करत असताना नैसर्गिक आपत्ती (पुर, चक्रीवादळ, भूकंप इ.) , वैद्यकीय आणीबाणी (जखमी खेळाडू, हृदयविकाराचा झटका, संसर्गजन्य रोग), सुरक्षा धोके (गर्दी नियंत्रण, दहशतवादी हल्ला, चोरी) वाहतूक आणि लॉजिस्टिक्स समस्यांमुळे होणारे विलंब यांचा अभ्यास करून आपत्ती व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

- **आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करणे - आणीबाणी प्रक्रियेचे नियोजन** –

आपत्ती निर्माण झाल्यास त्वरित निर्णय घेण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन समितीची नियुक्ती करणे गरजेचे आहे. आपत्ती ही नियंत्रणा बाहेरची असेल तर त्यास **स्थानीय प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांशी समन्वय ठेवून** पोलिस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका सेवा यांच्याशी संपर्क राखणे. **खासगी सुरक्षा आणि स्वयंसेवक यांची नेमणूक** – गर्दी नियंत्रण आणि अनुशासन राखण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी ठेवणे .

- **वैद्यकीय आणि आरोग्य सेवा व्यवस्थापन**

स्पर्धेच्या ठिकाणी मैदानावरती व प्रेक्षकांच्या बैठकीच्या ठिकाणी,प्रवेशद्वारात व मैदानात विविध ठिकाणी प्राथमिक उपचार आणि वैद्यकीय मदतीसाठी तज्ञ उपलब्ध असावेत. खेळाडू, प्रेक्षक आणि पर्यटकांसाठी आरोग्य तपासणी आणि आपत्कालीन सेवा पुरवणे. मैदानाच्या प्रवेशद्वाराला रुग्णवाहिका उभी असावी आणि जवळच्या रुग्णालयाशी समन्वय साधून ठेवलेला असावा.

- **वाहतूक आणि स्थलांतर व्यवस्थापन**

आपत्कालीन परिस्थितीत पर्यटक आणि खेळाडूंसाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था तयार ठेवणे. कोणती घटना घडलीच त्यासाठी तयार राहण्यासाठी ट्रॅफिक व्यवस्थापनासाठी स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधणे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामने असतील तर त्यासाठी आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी विमानतळ किंवा स्थानिक प्रवासाच्या सुविधा वेळेत उपलब्ध करून देणे.

- **पर्यावरणीय आपत्ती व्यवस्थापन (Environmental Crisis Management)**

हवामानाच्या अंदाजानुसार स्पर्धांचे वेळापत्रक वेळापत्रक ठरलेले असते त्यानुसार खेळाडू व क्रीडा प्रेक्षकांना त्यांची

माहिती देणे त्यानुसार वादळ, पाऊस किंवा उष्णतेच्या लाटेमुळे खेळाडूं व प्रेक्षकांनवर परिणाम होऊ नये म्हणून योग्य उपाययोजना करणे. पर्यावरणाच्या बदलामुळे येणाऱ्या आपत्तीसाठी क्रीडा स्थळावर आपत्कालीन सुरक्षित ठिकाणे निश्चित करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

- **पुनर्प्राप्ती आणि नंतरचे व्यवस्थापन (Post-Crisis Management) –**

आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे मूल्यांकन करून त्यानुसार मदत करणे. खेळाडू, प्रेक्षक आणि कर्मचाऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी समुपदेशन सुविधा पुरवणे व मार्गदर्शन करणे जेणेकरून सर्वजण पुन्हा स्थितीतील येतील. भविष्यात अशा परिस्थिती टाळण्यासाठी सुधारित नियोजनाचा आराखडा आखावा.

**(क) तांत्रिक कौशल्ये (Technical Skills)**

क्रीडा पर्यटनाचे यशस्वी आयोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी तांत्रिक कौशल्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास क्रीडा स्पर्धा अधिक प्रभावीपणे पार पडतात आणि पर्यटकांचा अनुभव सुधारतो.

क्रीडा पर्यटन यशस्वी करण्यासाठी आधुनिक तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेत. डिजिटल तंत्रज्ञान, AI, सोशल मीडिया, सुरक्षा उपाय आणि ऑटोमेशन यांचा प्रभावी वापर केल्यास क्रीडा स्पर्धांचे व्यवस्थापन अधिक सुव्यवस्थित होते आणि पर्यटकांना उत्कृष्ट अनुभव मिळतो.

**डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञान कौशल्ये (Digital & IT Skills) - क्रीडा पर्यटन करताना तांत्रिक कौशल्याचा वापर करतो त्यावेळी ऑनलाइन बुकिंग आणि तिकीट प्रणाली,**

वेबसाइट किंवा मोबाइल ॲपद्वारे तिकीट बुकिंग, प्रवेश व्यवस्थापनचा वापर करावा. स्पर्धेतील खेळाडूंची आकडेवारी, पर्यटकांची माहिती आणि आर्थिक व्यवस्थापन,**खेळाडूंनी केलेले कार्यमान खेळाडूंना समजण्यासाठी व क्रीडा पर्यटकांना माहिती होण्यासाठी डेटा विश्लेषण आणि व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहेत.GPS आणि लोकेशन ट्रॅकिंग** – वापर करून प्रवासासाठी योग्य मार्गदर्शन आणि वाहतुकीचे नियोजन करता येते.

**क्रीडा व्यवस्थापन प्रणाली ( Sports Management Systems) - क्रीडा स्पर्धेचे आयोजन करत असताना खेळाडूंना व प्रेक्षकांना चालू असलेल्या खेळाची माहिती देण्यासाठी आपणास लाइव स्कोर व ब्रॉडकास्टिंग तसेच** खेळांचे लाइव्ह अपडेट्स, स्कोअरबोर्ड व्यवस्थापन योग्य व्यवस्थापन करावे लागते**. खेळाडू व प्रेक्षकांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी VAR (Video Assistant Referee) आणि इतर तांत्रिक उपाय** करावा जेणेकरून फुटबॉल, क्रिकेटसारख्या खेळांमध्ये निर्णय घेण्यास मदत होईल. **प्रेक्षक आणि खेळाडूंसाठी स्मार्ट टेक्नॉलॉजी** स्टेडियममधील Wi-Fi, ॲप आधारित सूचना आणि VR अनुभव त्यांच्यासाठी सोयीस्कर होतो व ते आनंददायी अनुभव घेतात.

**सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी तांत्रिक कौशल्ये - आपत्ती व्यवस्थापन करत असताना तांत्रिक कौशल्याचा वापर करून जीवित हानी न होण्यासाठी याचा आपण वापर करू शकतो. ड्रोन तंत्रज्ञान** मोठ्या स्पर्धांदरम्यान गर्दी नियंत्रण आणि देखरेखीसाठी उपयोग **,सीसीटीव्ही आणि फेशियल रेकग्निशन प्रणाली** सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**. RFID (Radio Frequency Identification) आणि बायोमेट्रिक प्रवेश प्रणालीमध्ये** अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवेश प्रक्रियेसाठी तांत्रिक कौशल्याचा वापर करता येते.

**सोशल मीडिया आणि डिजिटल मार्केटिंग कौशल्ये - क्रीडा स्पर्धा आयोजित करत असताना दिलेल्या दिनांक मध्ये प्रेक्षकांपर्यंत त्या स्पर्धेची माहिती जाणे महत्त्वाचे आहे. त्यावरून प्रेक्षक आपला प्रवास, प्रवेश प्रक्रियेसाठी तिकीट याची नियोजन करतात. प्रेक्षकांना आपल्या स्पर्धेची माहिती होण्यासाठी SEO आणि डिजिटल जाहिरात, सोशल मीडिया मॅनेजमेंट** -फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यूट्यूब इत्यादींवर अपडेट्स दिल्यामुळे स्पर्धेचा प्रचार होतो आणि तिकीट विक्री वाढवणे. **प्रभावशाली विपणन (Influencer**

**Marketing)** खेळाडू आणि प्रभावशाली व्यक्तींच्या मदतीने पर्यटन आकर्षित करता येते.

**ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI & Automation) - क्रीडा स्पर्धेबाबत व पर्यटनाबाबत प्रश्न असतील तर खेळाडू व पर्यटकांना चॅटबॉट्स (Chatbots) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या साह्याने तात्काळ प्रश्न सोडवता येतील याचे व्यवस्थापन करावे. ऑटोमेटेड तिकीट आणि माहिती सेवा** QR कोड किंवा NFC तंत्रज्ञानाद्वारे क्रीडा प्रेक्षकांना सहज प्रवेश घेता येतो यासाठी तांत्रिक कौशल्याचा वापर होतो.

**डिजिटल पेमेंट आणि आर्थिक व्यवस्थापन कौशल्ये - स्पर्धा पाहण्यासाठी येणाऱ्या क्रीडा प्रेक्षकांसाठी प्रवेश तिकीट खरेदीसाठी व इतर सुविधांसाठी UPI, मोबाइल वॉलेट आणि डिजिटल बँकिंग सुविधा द्याव्यात तसेच Cryptocurrency आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञान** तिकीट विक्री आणि आर्थिक व्यवहार अधिक सुरक्षित होईल व रोख पैशाशिवाय व्यवहार करणे सोपे होईल .

**(ड) संशोधन आणि नाविन्यपूर्ण कौशल्ये (Research & Innovation Skills)**

**स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पर्यटनाची माहिती ठेवणे** – नवनवीन पर्यटन स्थळे, हॉटेल्स आणि ट्रॅव्हल प्लॅनिंगबद्दल माहिती ठेवणे.

**नवीन पर्यटन अनुभव तयार करणे** – पर्यटकांसाठी अनोख्या आणि नाविन्यपूर्ण अनुभवांची निर्मिती करणे.

**पर्यावरणपूरक पर्यटन (Eco-Tourism)** – पर्यावरणपूरक पर्यटन संकल्पनांचा प्रचार व प्रसार करणे.

खेळ आणि पर्यटन या दोन्ही क्षेत्रांमध्ये विविध प्रकारची कौशल्ये आवश्यक असतात. खेळामध्ये शारीरिक, मानसिक, तांत्रिक आणि संघभावनेशी संबंधित कौशल्यांची आवश्यकता असते. पर्यटन क्षेत्रात प्रभावी संवाद, वेळेचे व्यवस्थापन, डिजिटल कौशल्ये आणि नाविन्यपूर्ण संकल्पना महत्त्वाच्या असतात. योग्य प्रशिक्षण आणि अनुभवाच्या साहाय्याने या क्षेत्रांमध्ये उत्तम संधी निर्माण करता येतात.

## 2. खेळ आणि पर्यटन क्षेत्रातील शैक्षणिक अभ्यसक्रम

क्रीडा पर्यटन (Sports Tourism) हे क्रीडा व्यवस्थापन आणि पर्यटन व्यवस्थापन या दोन क्षेत्रांचा संगम आहे. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी विविध पदवी, पदव्युत्तर आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम क्रीडा आयोजन, पर्यटन व्यवस्थापन, विपणन, लॉजिस्टिक्स आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा उद्योग समजून घेण्यास मदत करतात.

**पदवी अभ्यासक्रम (Undergraduate Courses)**

**1) बी.ए. / बी.एससी. क्रीडा व्यवस्थापन (B.A. / B.Sc. in Sports Management)** -क्रीडा पर्यटन, क्रीडा विपणन आणि अर्थशास्त्र यावर भर, क्रीडा स्पर्धांचे नियोजन आणि व्यवस्थापन कौशल्ये शिकवले जातात. भारतात आणि परदेशात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध.

2) बी.बी.ए. क्रीडा व्यवस्थापन (BBA in Sports Management) व्यवसाय, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापनासोबत क्रीडा पर्यटनाचे ज्ञान, क्रीडा क्षेत्रातील उद्योजकता आणि ब्रँड व्यवस्थापन शिकवले जाते.

3) बी.ए. / बी.एससी. पर्यटन व्यवस्थापन (B.A. / B.Sc. in Tourism Management) पर्यटन उद्योग, हॉटेल व्यवस्थापन, आणि क्रीडा पर्यटन समजण्यासाठी उपयुक्त. क्रीडा आयोजन आणि इव्हेंट व्यवस्थापन यावर भर दिला जातो.

**पदव्युत्तर अभ्यासक्रम (Postgraduate Courses)**

1) एम.बी.ए. क्रीडा व्यवस्थापन (MBA in Sports Management) क्रीडा व्यवसाय, विपणन, प्रायोजकत्व आणि ब्रँडिंग याविषयी सखोल अभ्यास. FIFA, ICC, BCCI यांसारख्या संस्थांमध्ये काम करण्याची संधी. भारतात अनेक विद्यापीठे तसेच परदेशात युरोप आणि अमेरिकेत प्रसिद्ध अभ्यासक्रम.

2) एम.टी.एम. (Master in Tourism Management - MTM) पर्यटन क्षेत्रातील धोरणे, विपणन आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन व्यवस्थापन. क्रीडा पर्यटनाच्या विकासासाठी योग्य अभ्यासक्रम.

3) एम. एससी. क्रीडा विज्ञान आणि व्यवस्थापन (M.Sc. in Sports Science & Management)

क्रीडा क्षेत्रातील वैज्ञानिक दृष्टीकोन, खेळाडूंचे आरोग्य व्यवस्थापन आणि तांत्रिक कौशल्ये.

**प्रमाणपत्र आणि डिप्लोमा अभ्यासक्रम**

**(Certificate & Diploma Courses)**

1) डिप्लोमा इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट (Diploma in Sports Management) क्रीडा उद्योगाचे मूलभूत ज्ञान आणि स्पर्धा आयोजनावर भर, अल्पकालीन अभ्यासक्रम (६ महिने – १ वर्ष).

२) डिप्लोमा इन टुरिझम अँड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट (Diploma in Tourism & Hospitality Management) हॉटेल आणि पर्यटन व्यवसायासोबत क्रीडा पर्यटन यावर भर.

३) प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certification Courses)

FIFA/CIES Sports Management Programme

IOC (International Olympic Committee) Sports Management Courses

IATA (International Air Transport Association) Tourism & Travel Courses

भारतातील आणि परदेशातील प्रसिद्ध संस्थांचे अभ्यासक्रम

**1) भारतामधील प्रसिद्ध संस्था:**

1. **राष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, इंफाळ (National Sports University, Manipur)**
2. **लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्था, ग्वाल्हेर (LNIPE, Gwalior)**
3. **IIM Rohtak – MBA in Sports Management**
4. **MIT School of Management, Pune**
5. **Symbiosis School of Sports Sciences, Pune**

**2) परदेशातील प्रसिद्ध संस्था:**

1. **University of Massachusetts, USA – MS in Sport Management**
2. **FIFA Master – International Master in Management, Law & Humanities of Sport (Switzerland, UK, Italy)**
3. **University of Florida, USA – Sport Management Program**
4. **European Sport Business School, Spain**
5. **University of Liverpool, UK – MBA in Sports Business & Management**

**करिअर संधी (Career Opportunities in Sports Tourism)**

1. क्रीडा इव्हेंट व्यवस्थापक (Sports Event Manager)
2. पर्यटन आणि हॉस्पिटॅलिटी व्यवस्थापक (Tourism & Hospitality Manager)
3. क्रीडा पत्रकारिता आणि प्रसारण (Sports Journalism & Broadcasting)
4. क्रीडा विपणन आणि ब्रँड व्यवस्थापन (Sports Marketing & Brand Management)
5. क्रीडा संघटनांमध्ये व्यवस्थापक (Manager in Sports Organizations like BCCI, FIFA, IOC)
6. स्टेडियम आणि सुविधा व्यवस्थापन (Stadium & Facility Manager)

**निष्कर्ष**

क्रीडा पर्यटन क्षेत्रात करिअर करण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमांची विविधता उपलब्ध आहे. पदवी, पदव्युत्तर आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांद्वारे या क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये शिकता येतात. भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा आणि पर्यटन क्षेत्राचा वेगाने विकास होत असल्यामुळे या क्षेत्रातील करिअरच्या संधीही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. खेळ आणि पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर करिअर संधी उपलब्ध असून, त्याचा योग्य उपयोग केल्यास उज्ज्वल भविष्यासाठी मार्ग मोकळा होऊ शकतो. योग्य प्रशिक्षण, कौशल्ये आणि संधींचा लाभ घेतल्यास युवकांना या क्षेत्रांत मोठे यश मिळू शकते. स्पोर्ट्स टूर ऑपरेटर आणि आयोजक, ट्रॅव्हल ऑपरेटर, स्पोर्ट्स पत्रकार , ब्रॉडकास्टर,साहसी खेळ प्रशिक्षक,

टूरगाईड आणि कन्सल्टंट, क्रीडा इव्हेंट व्यवस्थापक, क्रीडा विपणन आणि ब्रँड व्यवस्थापन, क्रीडा संघटनांमध्ये व्यवस्थापक, स्टेडियम आणि सुविधा व्यवस्थापन या क्षेत्रात काम करण्यास संधी आहे.

संदर्भ:


7. Gibson, H. (1998). "Active Sport Tourism: Who Participates?" Leisure Studies, 17(2), 155-170.
8. Higham, J. (2005). Sport Tourism Destinations: Issues, Opportunities and Analysis. Elsevier.
9. Weed, M., & Bull, C. (2009). Sports Tourism: Participants, Policy, and Providers. Routledge.
10. Hinch, T., & Higham, J. (2011). Sport Tourism Development. Channel View Publications.
11. Weed, M. (2008). "Sport Tourism Theory and Methodologies" Journal of Sport & Tourism, 13(1), 1-13.
18. Sports Tourism in India (2022).
12. Gibson, H. (2006). "Sport Tourism: Concepts and Theories" Annals of Tourism Research, 33(2), 308-331.
13. Kurtzman, J., & Zauhar, J. (2003). "A Wave in Time: The Sport Tourism Phenomenon" Journal of Sport Tourism, 8(1), 35-47.
14. Global Report on Sports Tourism (2016). The Economic Impact of Sport Tourism (2022).
15. "Sports Tourism in India: Potential and Challenges" – 2021 Report.
16. FICCI Report on Sports Industry in India (2023).
17. ASSOCHAM Report on Adventure &


Cite this article:

सचिन सुभाषराव चामले, 2025 क्रीडा पर्यटन करिअर म्हणून संधी. *JES Bulletin*, 3(2):254-263.